# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १२/०६/२०२५ (गुरूवार)

---

## खापा पोलीस स्टेशन हद्दीत टायगर फोर्ट इको रिसॉर्ट ,मौजा टेंबुरडोह येथे वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या एकुण १० आरोपीतांवर गुन्हा नोंद , ८ पिडीतांची सुटका

**पोलीस स्टेशन खापा :–** दिनांक १२/०६/२०२५ रोजी श्री अनिल म्हस्के, सहा. पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर यांना गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहिती मिळाली की, पोलीस स्टेशन खापा हद्दीतील मौजा टेंबुरडोह ता. सावनेर येथील टायगर फोर्ट इको रिसॉर्ट येथे अवैधरित्या वेश्याव्यवसाय सुरू आहे. अशी माहीती मिळाताच श्री अनिल मस्के यांनी तात्काळ पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, प्रभारी अधिकारी खापा यांच्या नेतृत्वात एक पथक तयार करून त्यांना मौजा टेंबुरडोह, ता. सावनेर येथील टायगर फोर्ट इको रिसॉर्ट येथे रवाना होण्याबाबत आदेश दिले. सदर पथकाने टायगर फोर्ट इको रिसॉर्ट येथे धाड टाकली असता **आरोपी क्रं १) रिसॉर्ट मालक नामे विशाल मधुकर इंगोले, वय ३९ वर्षे, रा पोलीस स्टेशन धंतोली च्या मागे ,नागपुर हा मिळुन आला.** रिसॉर्टच्या खोल्यांची तपासणी केली असता ८ पिडीत महीला मिळुन आल्या. पिडीत महीलांची विचारपुस केली असता **आरोपी क्रं २) एक महीला आरोपी हीच्या** सांगण्यावरून **आरोपी क्र. ३) नामे अमित संताराम अपरेजा, रा. रेचल अपार्टमेंट, कमाल चौक, इंदोरा, नागपुर , आरोपी क्र. ४) संजय आनंदराव धापोडकर, रा. बिनाकीनगर, नागपुर आणि आरोपी क्र. ५) सचिन साहेबराव पाटील , रा. संजय गांधी नगर, नागपुर हे त्यांच्या कडील चारचाकी वाहनाने नमुद रिसॉर्ट मध्ये पिडीतांना आणुन, त्यांच्याकडुन** देहव्यापार करवुन घेतात व त्याबदल्यात त्यांना पैसे देतात अशी **माहीती पिडीत महीलांनी दिली.** पोलीसांना रिसॉर्टच्या तपासणी दरम्यान **आरोपी क्रं ६) मनिष कैलास देशमुख, वय ४१ वर्षे,रा. महाकालीनगर, प्लॉट नं ४० ,मानेवाडा,नागपुर आरोपी क्रं ७) नितीन रमेश कोकरडे, वय ३७**

**वर्षे, रा. वार्ड क्र ४ मोहाडे ले आउट वाडी, नागपुर , आरोपी क्रं** ८).**दिलीप धर्मराज शाहु, वय ३४ वर्षे,रा वार्ड क्र २३, आंबेडकर नगर, वाडी, नागपुर आरोपी क्रं** ९) **विनोद लहानुजी मोहजे, वय ४९ वर्षे,रा वार्ड नं. ५ कंट्रोल वाडी, नागपुर आरोपी क्रं** १०) **किसन मनिराम येसने, वय ३० वर्षे,रा.वार्ड क्र २३ आंबेडकर नगर, वाडी, नागपुर** हे मिळुन आले त्यांना रिसॉर्ट मध्ये कोणत्या कारणास्तव आले या बाबत विचारणा केली असता त्यांनी उडवा उडवीची उत्तरे दिली. तसेच पिडीत महीलांनी आरोपी **क्र ६ ते १० हे ग्राहक** असल्याबाबत माहीती दिली. नमुद घटनास्थळावरून पोलीसांनी पिडीतांना रिसॉर्ट वर आणण्यासाठी वापरलेली एक फोर्ड कंपनीची चारचाकी वाहन क्रमांक एम.एच. ४९ बी.के. ४१४१ किंमती ३०,००,०००/— , रोख रक्कम १५,०००/— रूपये, आणि इतर साहित्य असा एकुण ३०,१५,०००/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे.

. **नमुद एकुण आरोपी क्रं १ ते १० यांच्याविरूध्द कलम ३,४,५,६,७ स्त्रीया व मुली अनैतिक व्यापार (प्रतिबंध) अधिनियम सह कलम १४३ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करून ८ पिडीत महिलांची सुटका करण्यात आली आहे. सदर प्रकरणी पोलीसांनी नमुद रिसॉर्ट मालक आरोपी नामे विशाल मधुकर इंगोले याच्यासह आरोपी नामे अमित संताराम अपरेजा,आरोपी नामे संजय आनंदराव धापोडकर, आणि आरोपी नामे सचिन साहेबराव पाटील अशा ४ आरोपीतांना अटक केली आहे.**

## कोंबडयांची झुंज लावुन जुगार खेळणाऱ्यांवर गुन्हा नोंद.
## उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक ११/०६/२०२५ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, काही इसम **शिवापुर शिवार उमरेड येथे** कोंबडयाची झुंज लावून पैशांचा हारजितचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनस्थळी पोहचले असता, नमुद ठिकाणी काही इसम कोंबडयांच्या पायाला धारदार काती बांधुन त्यांच्यी झुंज लावुन पैशांचा हारजितचा खेळ खेळतांना दिसुन आले. पोलीसांनी सापळा रचुन धाड टाकली असता **आरोपी क्र. १) विनोद जगन्नाथ मिलमिले, वय ५५ वर्षे, रा. हनुमान मंदिराच्या समोर, कावरापेठ, उमरेड, २) संदिप प्रभाकर क्षिरसागर, वय ३८ वर्षे, रा. दत्तमंदिर जवळ इतवारीपेठ, उमरेड ३) योगेश लक्ष्मण निखार, वय ५२ वर्षे, रा. मटन मार्केट जवळ इतवारीपेठ**

**,उमरेड ४) कैलास नरसिगराव कंदरेवार, रा. उमरेड** हे घटनास्थळी मिळुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष आरोपीच्या ताब्यातून १) रोख रक्कम १४,९००/— रूपये २) ५ मोटर सायकल आणि ३) तीन कोंबडे असा एकुण **२,४६,४००/— रूपयाचा मुद्देमाल** जप्त केला आहे.

नमुद आरोपी क्रं १ ते ४ यांच्यावर उमरेड पोलीस स्टेशनला १२ (ब) म. जु. का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने